COTTON *Innovate*

Weekly Newsletter from Central Institute for Cotton Research, Nagpur

Issue 2, Volume 6, June 2017 A weekly newsletter from ICAR-CICR

## Seed distributed for demonstration trials under TSP to farmers under Girad Cluster of MGMG

The multidisciplinary team of scientist from ICAR-CICR comprising of Dr. Nandini Gokte Narkhedkar, (Plant Nematologist ), Dr. Shailesh Gawande (Plant Pathology) and Mr. Joy Das (Agriculture Biotechnology) visited the five Villages viz., Arvi, Mohgaon, Faridpur, Shivanphal and Jogingumpha of Girad cluster of Wardha district on June 12, 2017 under "Mera Gaon Mera Gaurav" programme. Farmer's workshop was organised and information regarding precautions to be taken during the sowing was discussed with the 52 participating farmers. Among these, Forty five Tribal farmers from four villages have taken up demonstration trials H-8 (BG II ) hybrid cotton in one acre plot under Tribal Sub Plan programme. Farmers were also informed about procedure for seed treatment with the bio fertilizers and fungicides to protect the crop from soil borne fungus during initial crop stage. Record of farmers participating in the programme under Tribal sub Plan was maintained along with suitable documentation. Farmers were also informed about Pradhan Mantri Fasal Bima Yojana. Main constraints faced by farmers were, low cotton prices and lack of labour availability during cropping season which affects profit margin of farmers due to high input cost.





# किसानों का मार्गदर्शन

गिरड। 19 जून। लोस

कपास की सुरक्षा और संवर्धन के संबंध में किसानों का मार्गदर्शन करने के लिए आई. सी. ए. आर. केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान ने पहल की है. यहां के चार वैज्ञानिक चार गांवों के किसानों का कपास की फसल की सुरक्षा के संबंध में मार्गदर्शन करेंगे.

केंद्र सरकार पुरस्कृत मेरा गांव मेरा गौरव कार्यक्रम अंतर्गत आई. सी. ए. आर.केंद्रीय कपास अनुसंधान संस्था के चार विशेषज्ञों ने गिरड समूह 5 गांव मोहगांव, फरीदपुर, जोगीनगुंफा व शिवणफल का चयन किया है. आई. सी. ए. आर. केंद्रीय कपास अनुसंधान संस्थान, नागपुर की प्रधान वैज्ञानिक वनस्पति कृमि विशेषज्ञ नंदिनी गोगटे, डॉ. सर्वानन, डॉ. शैलेश गावंडे, डॉ जोय दास आदि का समूह इन पांच गांवों में जाकर किसानों का फसल की सुरक्षा और बेहतर उत्पादन आदि के संबंध में मार्गदर्शन करेगा. कार्यक्रम अंतर्गत 45 आदिवासी किसानों को 2-2 बैग के अनुसार 1 एकड़ में प्रायोगिक तौर पर बीज बांटे गए हैं.

## आदिवासी शेतकऱ्यांना कपाशीच्या बियाणांचे वितरण

गिरड : केंद्र सरकारपुरस्कृत मेरा गाव मेरा गौरव या कार्यक्रमांतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील चार शास्त्रज्ञांची व गिरड समूहातील मोहगाव, आर्वी, फरीदपूर, जोगीनगुंफा व शिवणफळ या पाच गावांची निवड केली होती. प्रधान वैज्ञानिक वनस्पतिकृमीशास्त्र डॉ. नंदिनी गोगटे, वनस्पती प्रजननशास्त्र डॉ. सर्वानिन, वनस्पतिरोगशास्त्र डॉ. शैलेश गावंडे, व वनस्पती जैवतंत्र ज्ञान विभागाचे डॉ. जोयदास या चार शास्त्रज्ञांचा समावेश आहे. ही चमू वेळोवेळी या पाचगावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या कृषीविषयक तसेच कपाशी पिकासंदर्भात तांत्रिक अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्न करतात. याच अंतर्गत गिरड येथील मगन संग्रहालय समिती कार्यालयात निवडलेल्या पाच गावांतील आदिवासींना संकरित वाणाचे बियाणे वितरित करण्यात आले. तसेच शेतकरी कार्यशाळाही आयोजित करण्यात आली होती. या कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या ४५ आदिवासी शेतकऱ्यांना प्रत्येकी २ बॅगा या प्रमाणे एका एकरमध्ये प्रात्यक्षिकासाठी लागणारे वरीलप्रमाणे बियाणांचे नि:शुल्क वितरण करण्यात आले. तसेच या कार्यशाळेत कपाशी लागवडीची पद्धत व पिकाच्या प्राथमिक अवस्थेत घ्यावयाची काळजी याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

## आदिवासी शेतकऱ्यांना कपाशीच्या बियाण्यांचे वितरण



गिरड : गिरड येथील मगन संग्रहालय समिती कार्यालय येथे आईसीएआर - केंद्रीय कापूस संशोधन संस्थेअंतर्गत आदिवासी उपयोजनेच्या माध्यमाने शिवणफळ, आर्वी, मोहगाव व फारीदपूर या चार गावातील ४५ आदिवासी शेतकऱ्यांना संकरित वाणाचे बियाणे वितरित करण्यात आले तसेच शेतकरी कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

केंद्रसरकार पुरस्कृत मेरा गाव मेरा गौरव या कार्यक्रमाअंतर्गत आईसीएआर - केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील चार शास्त्रज्ञांची गिरड परिसरातील पाच गावे अनुक्रमे मोहगाव, आर्वी, फारीदपूर, जोगीनगुम्फा व शिवणफळ या गावासाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये डॉ. नंदिनी गोगटे, प्रधान वैज्ञानिक वनस्पती कृमी शास्त्र, डॉ. सर्वानन; वनस्पती प्रजनन शास्त्र, डॉ. शैलेश गावंडे, वनस्पती रोगशास्त्र व डॉ. जोय दास, वनस्पती जैवतंत्रज्ञान विभाग या केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील चार प्रमुख शास्त्रज्ञांचा समावेश आहे.

या कार्यक्रमांतर्गत ही चमू वेळोवेळी या गावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या कृषी विषयक तसेच कपाशी पिकासंदर्भात तांत्रिक अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्न करतात.

या कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या ४५ आदिवासी शेतकऱ्यांना प्रत्येकी २ बॅग याप्रमाणे एका एकरमध्ये प्रात्यक्षिकासाठी लागणारे वरीलप्रमाणे बियाण्याचे निशुल्क वितरण करण्यात आले. तसेच या कार्यशाळेत कपाशी लागवडीची पद्धत व पिकाच्या प्राथमिक अवस्थेत घ्यावयाची काळजी याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

## शेतकऱ्यांना कपाशीच्या बियाण्यांचे वितरण

वर्धा, ता. १८ : केंद्रसरकार पुरस्कृत 'मेरा गाव मेरा गौरव'या कार्यक्रमाअंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था (आयसीएआर), नागपूर येथील चार शास्त्रज्ञांची गिरड समूहातील पाच गावे अनुक्रमे मोहगाव, आर्वी, फरीदपूर, जोगीनगुंफा व शिवणफळ या गावांसाठी निवड करण्यात आली होती. यामध्ये वनस्पती कृमीशास्त्र प्रधान वैज्ञानिक डॉ. नंदिनी गोगटे, वनस्पती प्रजनन शास्त्राचे डॉ. सर्वानन, वनस्पती रोगशास्त्र डॉ. शैलेश गावंडे, वनस्पती जैवतंत्रज्ञान विभागाचे डॉ. जोय दास या केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर येथील चार प्रमुख शास्त्रज्ञांचा समावेश आहे. या कार्यक्रमांतर्गत ही चमू वेळोवेळी या पाच गावांना भेट देऊन शेतकऱ्यांच्या कृषीविषयक तसेच कपाशी पिकासंदर्भात तांत्रिक अडचणींचे निवारण करण्याचा प्रयत्न करतात. याच अंतर्गत गिरड येथील मगन संग्रहालय समिती कार्यालयात आयसीएसआर केंद्रीय कापूस संशोधन संस्थेअंतर्गत आदिवासी उपयोजनेच्या माध्यमाने गिरड समूहातील अनुक्रमे शिवणफळ, आर्वी , मोहगाव व फरीदपूर या चार गावांतील ४५ आदिवासी शेतकऱ्यांना एच ८ (बीटी- बीजी २) या संकरित वाणाचे बियाणे वितरित करण्यात आले तसेच शेतकरी कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यक्रमांतर्गत निवडलेल्या ४५ आदिवासी शेतकऱ्यांना प्रत्येकी २ बॅग याप्रमाणे एका एकरमध्ये प्रात्यक्षिकासाठी लागणारे वरीलप्रमाणे बियाण्यांचे नि:शुल्क वितरण करण्यात आले.

Produced and Published by: Dr. M. S. Ladaniya, Director, CICR, Nagpur
Chief Editor : Dr. S. M. Wasnik
Digital Editor, design & Media Support : Dr. M. Sabesh
Editors: Dr. J Annie Sheeba, Dr. Vishlesh Nagrare, Dr. J Amutha, Dr. M Saravanan

Citation : Cotton Innovate, Issue-2, Volume-6, 2017,
ICAR-Central Institute for Cotton Research, Nagpur.

Publication Note: This Newsletter presented online at http://www.cicr.org.in/cotton_innovate.html

Cotton Innovate is the Open Access CICR Newsletter

The Cotton Innovate – is published weekly by
ICAR-Central Institute for Cotton Research
Post Bag No. 2, Shankar Nagar PO, Nagpur 440010
Phone : 07103-275536; Fax : 07103-275529;
email: cicrnagpur@gmail.com, director.cicr@icar.gov.in